**नि.फौ.ख.क्र. ४३/२००८.**
शासन वि. रफिक.
<u>नि.क्र.९६</u>

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०८

मी शपथेवर खरे कथन करतो की,

नाव : पांडुरंग राजाराम बोरगे,
वय : ५१ वर्षे, व्यवसाय: वरिष्ठ लिपीक,
रा. मलकापुर, कराड, ता. कराड, जि. सातारा.

**सरतपासणी – सरकारी वकील श्रीमती एन.एस.अहिवळे यांचेमार्फत–**

१. सन २००७ मध्ये मी तत्कालीन ग्रामपंचायत, मलकापुर कार्यालयात आवक जावक विभागात लिपीक म्हणुन कार्यरत होतो. मी संबंधित कार्यालयामध्ये आलेल्या अर्जावर शिक्के मारुन त्यास आवक क्रमांक देवुन संबंधित विभागाकडे पाठवित होतो. सदर शिक्के माझ्या ताब्यात होते. आरोपी क्र. २ सलाऊद्दीन याला मी ओळखतो. संबंधित आरोपी अर्ज देण्याकरिता माझ्या कार्यालयामध्ये आला असेल. त्यावेळी राजेंद्र सुरी पतसंस्थेने कर्जाचा बोजा चढविणेकरिता संबंधित ग्रामपंचायतीला पत्र दिले होते. सदर पत्र मी संबंधित कर्मचारी यांचेकडे दिले होते. सदर पत्र प्राप्त झाले त्यावेळी ग्रामसेवकाने मला सांगितले होते की, त्या मिळकतीच्या उतारा–यावर पहिला बोजा नमूद आहे. मी विवादित उतारा पाहिला नव्हता. संबंधित ग्रामसेवक यांनी पहिला बोजा उता–यावर असलेमुळे बैठकीमध्ये तो मुद्दा मांडला होता. त्या बैठकीमध्ये तो उतारा बनावट असलेबाबत चर्चा झाली होती. त्यानुसार तत्कालीन सदस्य मंडळाने केस दाखल केल्याचे मला समजले होते. आरोपी क्र. २ आज न्यायालयात हजर आहे.
**<u>सरतपास पुर्ण</u>.**

**आरोपीच्या वतीने विद्वान विधिज्ञ श्री. एस.एस.निकम यांचेमार्फत उलटतपास शपथेवर सुरु**

२. हे म्हणणे खरे आहे की, तपासादरम्यान पोलीसांनी माझ्या सांगणेप्रमाणे जबाब नोंदविला होता. सदर जबाब नोंदवितेवेळी मी पोलीसांना मी आरोपी क्र. २ यास ओळखत असल्याचे सांगितले नव्हते. सदर जबाब नोंदवितेवेळी मी पोलीसांना ''संबंधित आरोपी अर्ज देण्याकरिता माझ्या कार्यालयामध्ये आला असेल, त्यावेळी राजेंद्र सुरी पतसंस्थेने कर्जाचा बोजा चढविणेकरिता संबंधित ग्रामपंचायतीला पत्र दिले होते, सदर पत्र मी संबंधित कर्मचारी यांचेकडे दिले होते, सदर पत्र प्राप्त झाले त्यावेळी ग्रामसेवकाने मला सांगितले होते की, त्या मिळकतीच्या उतारा–यावर पहिला बोजा नमूद आहे'' असे सांगितले नव्हते.

३. मी पोलीसांना जबाब देतेवेळी ''संबंधित ग्रामसेवक यांनी पहिला बोजा उता–यावर असलेमुळे बैठकीमध्ये तो मुद्दा मांडला होता, त्या बैठकीमध्ये तो उतारा बनावट असलेबाबत

चर्चा झाली होती, त्यानुसार तत्कालीन सदस्य मंडळाने केस दाखल केल्याचे मला समजले होते'' हा मजकूर सांगितला होता. आता मी सदर पोलीसांनी नोंदविलेला जबाब वाचुन पाहिला. सदर मजकूर माझ्या पोलीस जबाबात नमुद नाहीत. का नमुद नाहीत याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांना सदर मजकुर सांगितला नव्हता त्यामुळे त्यांनी तो नमुद केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे कामकाज केवळ आवक जावक विभागातील असुन महत्वाच्या मुद्यासंबंधात बैठक अगर निर्णय घेतेवेळी मला बोलाविले जात नहाही. हे म्हणणे खरे आहे की, सरतपासामध्ये नमुद कथित बैठकीस मी उपस्थित नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे कथित बैठकीमध्ये काय चर्चा झाली याची मला व्यक्तीशः माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, केवळ कर्मचारी या नात्याने खबर देणार यांच्या सांगणेवरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2026.08.03 17:45:22 +0530

दि. ०३/०८/२०२६.

(अ.अ उत्पात)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कराड.
**(कोर्ट क्र.०४)**

**नि.फौ.ख.क्र. ४३/२००८.**
शासन वि. रफिक.
<u>नि.क्र.९५</u>

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०७</u>**

मी शपथेवर खरे कथन करतो की,

नाव : गजानन लक्ष्मण रैनाक,
वय :  ५२ वर्षे, व्यवसाय: काही नाही,
रा. मलकापुर, कराड, ता. कराड, जि. सातारा.

**<u>सरतपासणी – सरकारी वकील श्रीमती एन.एस.अहिवळे यांचेमार्फत–</u>**

१. दि.१९/१२/२००७ रोजी मला पोलीसांनी विवादित उतारे जप्त करणेकरिता जप्ती पंचनामा करण्यासाठी पंच म्हणून बोलविले, असे काही घडले नाही. तेव्हा पोलिसांनी माझी स्वाक्षरी घेतली होती. आता मला सरकारी वकिलांनी जप्ती पंचनामा दाखविला. त्यावर पंच क्र. ०२ म्हणून माझी सही आहे.  त्यातील मजकूर मला माहित नाही.

**<u>सरकारी वकिलांतर्फे सरतपास पुर्ण</u>.**

**<u>सरकारी वकीलांना भारतीय पुरावा कायदा कलम १५४ च्या अन्वये उलटतपासाची परवानगी देण्यात येत आहे.</u>**

**<u>उलटतपास सरकारी वकीलांतर्फे –</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.१९/१२/२००७ रोजी मला पोलीसांनी विवादित उतारे जप्त करणेकरिता जप्ती पंचनामा करण्यासाठी पंच म्हणून बोलविले. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्या समक्ष जप्ती पंचनामा केला होता, तो मला वाचून दाखविल्यानंतर मी त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचे असल्याने मी त्यांना वाचवण्याकरिता आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास सरकारी वकिलांतर्फे पुर्ण</u>.**
**आरोपीच्या वतीने विद्वान विधिज्ञ यांनी उलटतपास नाकारला.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2026.08.03 17:45:28 +0530

दि. ०३/०८/२०२६.

(अ.अ उत्पात)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कराड.
(कोर्ट क्र.०४)